# बृहन्मुंबई महानगरपालिका
## देवनार पशुवधगृह
### स्वारस्याची अभिव्यक्ती सूचना

महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी खालील दिलेल्या कामाकरिता, एम पुर्व / एम पश्चिम विभागामधिल कार्यक्षेत्रात ऑगस्ट 2000 नंतर स्थापना असणा-या व सहकार कायदा 1960 अन्वये नोंदणीकृत असणा-या व त्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या इच्छुक स्थानीक नोंदणीकृत बेरोजगार संस्था, स्थानीक मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था, यांचेकडून विहित अटी व शर्तीवर स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्याचे ठरविलेले आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | छाननी शुल्क | स्वारस्याची अभिव्यक्तीकरिता आवश्यक अर्हता | नियत दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | देवनार पशुवधगृहाच्या आवारात अशासकीय व बहुउद्देशिय संस्थेच्या कामगारांची माहे जानेवारी 2025 ते डिसेंबर 2025 या कालावधीकरिता आवश्यकतेनुसार नियुक्ती करणेबाबत. | रु.660/- अधिक 18% GST | 1) स्थानिक संस्था बृहन्मुंबई महापालिकेची नोंदणीकृत वेंडर असणे आवश्यक आहे.<br>2) स्थानिक संस्था एम पुर्व/ एम पश्चिम विभागामधिल कार्यक्षेत्रातील असणे आवश्यक आहे.<br>3) या स्थानिक संस्था सहकार कायदा 1960 अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.<br>4) स्थानिक संस्थाची स्थापना ऑगस्ट 2000 नंतर झालेली असावी.<br>5) या स्थानिक संस्था किमान 6 महिने कार्यरत असणे, तसेच त्यानी यापुर्वी कामे केल्याचा अनुभव/कार्यादेश सादर करणे.<br>6) स्थानिक संस्थेने शासनाच्या अधिकृत प्राधिका-याने योग्य त्या नमुन्यात दिलेले GST चे मुळ नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करणे.<br>7) स्वारस्याची अभिव्यक्ती अर्जासोबत वरील तसेच अटी व शर्ती नुसार आवश्यक असलेले कागदपत्रे सादर करणे आहे<br>8) स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी पात्र असणा-या संस्थांमधुन 48 किंवा 48 पेक्षा कमी पात्र ठरलेल्या अशासकीस बहुउद्देशिय/बेरोजगार संस्थांना अशासकीय संस्थांना सोडत पद्धतीने सदर काम समानतेच्या तत्वावर विभागुन देण्यात येईल. | 24.12.24 |

वर उल्लेख केल्याप्रमाणे स्वारस्याची अभिव्यक्ती अर्जाचे छाननी शुल्क रु.660/- अधिक 18 टक्के GST महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्र येथे भरल्यानंतर महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय दुसरा मजला गोवंडी मुंबई-400043 या ठिकाणी नियत दिनांकाच्या एक दिवस अगोदर दुपारी 04.00 वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपलब्ध होतील. अभिव्यक्ती अर्जाच्या छाननी शुल्क भरुन त्याची पावती अभिव्यक्ती अर्जाच्या प्रत घेण्यासाठी सोबत सादर करावी. सदर शुल्काची रक्कम रोख रक्कमेद्वारे स्विकारण्यात येईल. चेक स्विकारण्यात येणार नाहीत.

स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज भरुन व शिक्क्यानिशी स्वाक्षांकित करुन लखोट्यामध्ये सील बंद करावा व लखोट्यावर महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका असा पत्ता लिहावा व महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालयात नियत दिनांका दिवशी दुपारी 01.00 वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहचतील अशाप्रकारे पाठविण्याची व्यवस्था करावी.

सही/-
महाव्यवस्थापक
देवनार पशुवधगृह